# पाटोदा संचार

PATODA SANCHAR

E-mail-pat.sanchar@gmail.com संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे **संपादक-विलास डोळसे**

❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक ९९ वा ❑ शुक्रवार दि.२३ मे २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -99 ❑ Friday 23 May 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1. ❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359


## दरवर्षी तोच घाणा आणि तेच आदेश : विद्यापीठाने २३३ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे प्रवेश रोखले; करोडोची कमाई होत असल्याची चर्चा-ॲड.अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर यांनी शैक्षणिक वर्ष २०२५/२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील चार जिल्ह्यातील दोनशे तेहतीस महाविद्यालयांच्या प्रथम वर्षाचे प्रवेश पूर्णपणे रोखण्याचे आदेश दिले आहेत. दरवर्षी विद्यापीठाचा तोच घाना असतो. यातून काही करोडोची कमाई होत असल्याची चर्चा शैक्षणिक क्षेत्रामध्ये ऐकायला मिळते, असा आरोप ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख यांनी केला आहे.

विद्यापीठाच्या उपकुलसचिव (शैक्षणिक विभाग) यांनी दिनांक १७/०५/२०२५ रोजी मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन न केलेल्या संलग्नित महाविद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्षाची प्रवेश क्षमता स्थगित करण्याबाबतचे आदेश जाहीर केले आहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षमतेचा अभ्यास केला असता दरवर्षी हे आदेश काढले जातात. काही महिन्यात हे आदेश गुंडाळून ठेवले जातात. त्यामुळे विद्यापीठाच्या गुणवत्तेची वाट लागली आहे. त्याला दस्तुर खुद्द विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप देखील देशमुख यांनी केला आहे.

नॅक मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन करून विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र चांगल्या सुविधा दिल्या जात नाहीत. याची तपासणी विद्यापीठाच्या अधिष्ठाता मंडळ समोर होते. या तपासणीतून महाविद्यालयांची नावे काढली जातात. त्यांची प्रवेश क्षमता शून्य करण्यात येते. मात्र दरवर्षी तोच घाणा घालून विद्यापीठ शैक्षणिक गुणवत्ता ढासळवत आहे.

विद्यापीठाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ८७ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातील ६४ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. त्याचप्रमाणे जालना जिल्ह्यातील ५१ इतके महाविद्यालयांची तर धाराशिव येथील ३१ इतक्या महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तब्बल २३३ महाविद्यालय नियमाचे उल्लंघन करून महाविद्यालय चालवीत



असल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा उघडकीस आली आहे.

महाविद्यालय चालवणाऱ्या संस्थाचालकांना त्याचबरोबर तेथील प्राचार्य, प्राध्यापक यांना आणि विद्यापीठाच्या कुलगुरू पासून ते वेगवेगळ्या विभागाचे उपकुलसचिवांपर्यंत एक साखळी निर्माण झाली आहे. ही साखळी विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा पुरवीत नाही. तरी देखील कोट्यावधी रूपयांचे पगार दर महिन्याला केले जातात. जाणीवपूर्वक केले जाणारे हे कृत्य विद्यापीठ थांबवत नाही, तोपर्यंत मराठवाड्यातील गुणवत्ता वाढणार नाही, असेही ड. अजित देशमुख यांनी म्हंटले आहे.

बीड जिल्ह्यातील प्रवेश रोखलेल्या महाविद्यालयांची यादी

आदित्य कॉलेजचे एम.बी.ए., व अध्यापक, शाहू अध्यापक महाविद्यालय मोरेवाडी अंबाजोगाई, कला वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज कुसळंब,

अब्दुल कलाम कॉम्प्युटर सायन्स कॉलेज नेकनूर, कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमन्स बीड, केशवराज सीनियर कॉलेज दासखेड, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बीड, साईराम आर्ट्स सायन्स कॉलेज, भाऊसाहेब पाटील कॉलेज केज, रामचंद्र धस कॉम्प्युटर कॉलेज आष्टी, संभाजी संभाजी राजे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स शिरूर कासार, श्री बीएसपीएम अध्यापक महाविद्यालय अंबाजोगाई, जनता आर्ट, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज धानोरा, अध्यापक महाविद्यालय कारी, आदित्य इंजीनियरिंग कॉलेज बीड, एसएसपीएमएस कॉलेज ऑफ एज्युकेशन आष्टी, जनविकास महाविद्यालय आपेगाव, राजमाता जिजाऊ आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मादळमोही, संत भगवान बाबा कॉलेज केज, गुरु विरोपक्ष कला महाविद्यालय मानूर, गुरुकुल कॉलेज ऑफ एज्युकेशन बीड, तुलसी कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बीड, गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ एज्युकेशन अंबाजोगाई, स्वामी विवेकानंद कॉलेज परळी, तांबवेश्वर कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स केज, भगवानराव केदार कॉलेज वारणी, कला आणि विज्ञान महाविद्यालय आष्टी, पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर अध्यापक महाविद्यालय गढी, संत भगवान बाबा कला विज्ञान कॉलेज घाटशीळ पारगाव, शंकरराव गुट्टे ग्रामीण महाविद्यालय धर्मापुरी, गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी माजलगाव, मिठूलालजी सारडा एमबीए कॉलेज बीड, याशिवाय अनेक महाविद्यालयाचा यात समावेश आहे. या सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नयेत, असे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

## 'ॲग्रिस्टॅक' अंतर्गत पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या जमाबंदी आयुक्तालय आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक व वेळेवर मिळवून देण्यासाठी 'ॲग्रिस्टॅक' योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांची व त्यांच्या शेतांची माहिती संकलित करणे आणि त्या माहितीच्या आधारे सरकारी योजनांचे कार्यान्वयन अधिक प्रभावी व सुलभ बनवणे आहे. राज्यातील कृषिक्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारकरीत्या शेतकऱ्यांना लाभ देणे सुलभ व्हावे, याकरिता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आला असून 'ॲग्रिस्टॅक' अंतर्गतच पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी सुद्धा फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आला आहे .पीएम किसान योजनेंतर्गत पात्र सर्व लाभार्थी यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी 'ॲग्रिस्टॅक अंतर्गत नोंदणी गरजेची आहे. तरी शेतकऱ्यांनी विनाविलंब 'ॲग्रिस्टॅक नोंदणी करून घ्यावी जेणेकरून कोणताही पात्र शेतकरी पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

## अडीच वर्षापूर्वी बालविवाह लावण्यात आला; मुलाला जन्म दिल्यानंतर बालविवाहासह पोक्सोचा गुन्हा दाखल

केज । प्रतिनिधी

शासनाने कितीही कठोर कायदा केला तरी अनेक ठिकाणी बालविवाह होऊन कोवळ्या वयात अल्पवयीन मुलींवर मातृत्व लादले जाते, आणि अशा अल्पवयीन मुलींचे बालपण हिरावून घेतले जाते. असाच केज तालुक्यात सुमारे अडीच वर्षापूर्वी बालविवाह लावण्यात आला परंतू त्यावेळी सर्व यंत्रणांना गुंगारा देण्यात आला होता. मात्र त्या नंतर त्या अल्पवयीन मातेची प्रसूती झाल्या नंतर बालविवाह आणि बालालैंगिक अत्याचारप्रकरणी केज तालुक्यातील कोरडेवाडी येथील अशोक बारीकराव यादव याच्यावर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील अल्पवयीन पीडित मुलीचा बालविवाह हा तिचे आई, वडील व नातेवाईकांनी नोव्हेंबर २०२३ मध्ये अशोक बारीकराव यादव रा. कोरडेवाडी याचे सोबत लावून दिला होता. दरम्यान पीडित अल्पवयीन मुलगी गरोदर राहिल्यानंतर रविवारी दि.१८ मे तिच्या पोटात दुखू लागल्यामुळे सासरच्या मंडळींनी तीला नेकनूर येथील शासकीय महिला रुग्णालयात दाखल केले. या दरम्यान महिलेची रुग्णालयात प्रसूती झाली व तीला मुलगा झाला.

दरम्यान उपचार करणारे वैद्यकीय अधिकारी डॉ. मसुरे यांनी महिलेच्या नातेवाईकांकडे आधार कार्डची मागणी केल्यानंतर या पीडितेचा बालविवाह झाल्याचे डॉक्टरच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी ही माहिती नेकनूर पोलिसांना कळविली. अडीच वर्षांपूर्वी हा बालविवाह केज तालुक्यातील कोरडेवाडी येथे झाल्यामुळे ही माहिती केज पोलिसांना देण्यात आली.

त्या नुसार केज पोलिसात अशोक बारीकराव यादव रा. कोरडेवाडी ता. केज याचे विरुद्ध बालविवाह आणि बाल लैंगिक अत्याचार कलमान्वये गुन्हा नोंद झाला आहे. पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत. पीडित अल्पवयीन महिला व बाळ हे नेकनूर येथील रुग्णालयात सुखरूप असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. मसुरे यांनी दिली आहे.

## जिल्हा हद्दीत ३ जूनपर्यंत ड्रोन कॅमेरा, मानवविरहीत यंत्र उडविण्यास मनाई

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय सैन्याकडून पहलगाव येथील दहशतवादी हल्ल्याचे नंतर ऑपरेशन सिंदुर राबवुन पाकिस्तान मधील दहशतवाद्यांची ठिकाणे नष्ट करण्यात आलेली आहेत. यामुळे स्लीपर सेल सक्रिय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ड्रोन कॅमेरा, मानवविरहित यंत्र चालविण्यास, उडविण्यास मनाई करणेबाबत दिनांक १४ मे ते ३ जून २०२५ पर्यंत भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ लागू करणे बाबत राज्य गुप्तवार्ता विभाग मुंबई यांनी कळविले आहे.


सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण बीड जिल्ह्यात दिनांक १४ मे २०२५ पासून ते ३ जून २०२५ पर्यंत तातडीचे परिस्थितीत, नमूद कालावधी करिता भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ (१)(३) अन्वये आदेश लागू करणेस विनंती करण्यात आली आहे.

तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) मधील शक्तीचा वापर करून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बीड जिल्हा हद्दीत दि. १६ मे २०२५ ते ३ जून २०२५ या कालावधीत ड्रोन कॅमेरा, मानवरहीत यंत्र चालविण्यास किंवा उडविण्यास मनाई आदेश एकतर्फी पारीत करण्यात येत आहे, असे बीडचे अपर जिल्हादंडाधिकारी यांनी नमुद केले आहे.

## मंत्रिपदाबाबत छगन भुजबळांचा मोठा गौप्यस्फोट; थेट सांगूनच टाकलं....

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांची मंत्रिपदाची गेल्या बर्याच महिन्यांपासून सुरू असलेली प्रतीक्षा अखेर संपली आणि त्यांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश झाला. धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळातून गच्छंती झाल्यानंतर त्यांच्या जागी भुजबळ येतील हे अपेक्षितच होते, पण त्यासाठीही भुजबळांना बरीच वाट पाहायला लागली. भुजबळ हे ओबीसी समाजाचे मातब्बर नेते समजले जातात.



अखेर भुजबळ यांना मंत्रिपद मिळालं आहे. त्यानंतर आज भुजबळ यांनी माध्यमांशी संवाद साधताना विविध विषयांवर प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी मंत्रिपदाबाबत मोठा गौप्यस्फोट देखील केला आहे.

ते म्हणाले की, मला काल

पान दोन वर

## पाटोदा शहरातील क्रांतीनगर भागातील भूमिगत नाल्याचे काम निकृष्ठ दर्जाचे-मोबीन शेख

### चौकशी होत नाही तोपर्यंत बील देऊ नये

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील क्रांतीनगर भागातील भूमिगत नाल्याचे काम हे निकृष्ठ दर्जाचे व अंदाजपत्रकानुसार होत नसून या कामाची चौकशी गुणनियंत्रण समितीमार्फत करावी त्यानंतरच कामांचे बील अदा करण्यात यावे अशी मागणी शेख मूबीन यांनी मुख्याधिकारी नगरपंचायत पाटोदा यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात या कामाचे देयके जोपर्यंत गुणनियंत्रण समितीमार्फत चौकशी होत नाही तोपर्यंत बील देऊ नये दिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी देयके देणाऱ्यावर राहील असा इशाराही दिला आहे.




शेख मोबीन यांनी दिनांक १४ मे रोजी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की पाटोदा नगरपंचायत अंतर्गत वर्ष २०२४-२५ मध्ये मंजूर विकास कामे प्रभाग १५.१६,१७ मध्ये अंडरग्राउंड नाल्याचे कामे होत आहेत मात्र हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाची यामध्ये अंडरग्राउंड नाली रस्ता बांधकाम इत्यादी कामे हे पूर्वी झालेल्या ठिकाणीच रिपीट घेण्यात आलेली आहेत व ती निकृष्ट दर्जाची आहेत. अंडरग्राउंड नाल्यासाठी वापरलेली पाईप दर्जाहीन आहेत. कामाच्या ठिकाणी माहिती फलक देखील लावलेली नाहीत. एकूणच अंदाजपत्रकाप्रमाणे काम, कामाचा दर्जा, साहित्य नाही. माहिती अधिकार कायद्याअंतर्गत या संदर्भाने नगरपंचायत पाटोदा कडे याबाबत माहिती मागून देखील ती भेटत नाही, त्या अर्थी नगरपंचायत यंत्रणा या सर्व भ्रष्ट कारभार खतपाणी घालत आहेत.

तरी या सर्व बाबींची सखोल चौकशी व तपासणी होईपर्यंत मुख्याधिकारी यांनी एजन्सीचे बिल रक्कम अदा करण्यात यावे बिल अदा केल्यास आपण याची सर्वम्वी जवाबदार राहील असेही निवेदनात शेख मुबीन यांनी म्हटले आहे.

## अपहरण करून दारू पाजत मारहाण करणाऱ्या चौघांविरोधात गुन्हा

**बीड । प्रतिनिधी**

कारच्या काचा फोडल्याच्या संशयावरून अप्पा राठोड (रा. जीवणापूर, ता. माजलगाव) या व्यक्तीचे अपहरण करून बेदम मारहाण केली होती. या प्रकरणी चौघांविरोधात बुधवारी पहाटे माजलगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

ज्ञानेश्वर राठोड, रमेश जयराम पवार, राहुल मधुकर राठोड व अनोळखी एक (सर्व रा. माजलगाव) अशी आरोपींची नावे आहेत. १८ मे रोजी गावी जाताना अप्पा यांना चहा पाजतो, असे म्हणत दोघांनी दुचाकीवरून ढाब्यावर नेले. तेथे रमेश पवारसह चौघांनी त्यास दारू पाजून मारहाण केली. त्यानंतर जीपमधून वेगवेगळ्या ठिकाणी नेत मारहाण केली होती. यात अप्पा यांच्या डोक्याला सात टाके पडले होते. शिवाय अंगावरही सर्वत्र व्रण होते. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू होते. मंगळवारी माजलगाव ग्रामीण पोलिसांनी जबाब घेतला. त्यानंतर बुधवारी पहाटेच्या सुमारास चौघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

**काच फोडल्याचा राग**

अप्पा राठोड यांनी कारची काच फोडली, असा संशय रमेश पवार याला होता. त्यामुळेच त्याने दोन दिवसांपूर्वी त्यांना शिवीगाळ केली होती. त्यानंतर आता त्याचाच राग धरून मारहाण केल्याचे अप्पा यांनी तक्रारीत म्हटले आहे. नुकसानभरपाई देतो, असे म्हटल्यावरही मारहाण करीतच राहिल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

## एसपींकडून बीड पोलीस दलात ६०६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

**बीड । प्रतिनिधी**

मागच्या अनेक वर्षांपासून खुर्चीवर चिकटून बसलेले पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या अखेर नवनीत कॉवत यांनी गुरुवारी (दि.२२) बदल्या केल्या आहेत. आजपर्यंत इतिहासात पहिल्यांदाच कोणत्याही वशिलेबाजी अथवा पैशांचा घोडेबाजार न भरविता तब्बल ६०६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्यात.एसपींनी बदल्यांसाठी राबविलेला पारदर्शी कारभार जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला असून अनेकांना यामुळे मात्र धक्का बसला आहे.



पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी स्वतः बदल्यांमध्ये लक्ष घालून कालावधीपूर्ण झालेले आणि निकषात बसणाऱ्या कर्मचारी आणि सहाय्यक फौजदारांना बदलीपासून संरक्षण मिळणार नसल्याचे आधीच जाहीर केले होते.अनेक पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी तरीही स्वतःची खुर्ची टिकविण्यासाठी आपल्या 'गॉडफादर'कडे धाव घेत एसपींना बदल्यांमध्ये झुकते माप देण्यासाठी सूचना करायला लावल्या.अगदी स्वतः नवनीत कॉवत यांनी बदल्यांसाठी अनेकांशी संवाद साधताना कर्मचाऱ्यांचे म्हणणेही ऐकून घेतले. पण जे कर्मचारी दीर्घकाळापासून एकाच विभागात आणि शहरात कार्यरत होते त्यांना थेट दणका दिल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.पोलीस दलात पहिल्यांदाच ६०६ कर्मचाऱ्यांची थेट खांदेपालटच करण्यात आली असून एसपींनी स्वतः बदल्यांसाठी तीन दिवसांपासून वेळ दिला होता अशी माहिती आहे.ते कार्यालयात आले तरी त्यांचे सर्व लक्ष बदलीपात्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीतच होते.नवनीत कॉवत यांनी बीड जिल्ह्यात पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये घालून दिलेल्या वस्तुपाठ सध्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला असून एसपींना लोकप्रतिनिधींना देखील मी कोणाचेच चुकीचे ऐकणार नसल्याचा देखील या माध्यमातून संदेश दिल्याचे पाहायला मिळत आहे

पाटोदा संचार

## शिक्षणाधिकारी चौकशीच्या फेऱ्यात

राज्यात सध्या शिक्षक भरती घोटाळा चर्चेचा विषय बनला आहे. नागपूरमध्ये देखील शिक्षक भरती प्रकरणी चौकशी सुरु झाली आहे. बीड जिल्ह्यातही शिक्षक भरतीमध्ये खासगी शिक्षण संस्था चालक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी संगनमत करुन कोट्यवधींचा घोटाळा केल्याच्या तक्रारी आहेत. पवित्र पोर्टलमध्ये खेळ करत शिक्षकांना नियुक्त्या देण्यात आल्या आणि त्या नियुक्त्यांना शिक्षण विभागाने मान्यताही दिली अशा तक्रारी आहेत. विशेष म्हणजे यासंदर्भातील कोणतीच माहिती दिली जात नव्हती. एवढंच नाही तर, माहिती अधिकारात देखील माहिती द्यायला शिक्षण विभाग तयार नाही. या संपूर्ण प्रकरणात शेकडो कोटींची उलाढाल झाल्याच्या तक्रारी होत्या. या संदर्भात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष सादिक इनामदार यांनी राज्याच्या शिक्षण मंत्र्यांकडं तक्रार केली होती. त्यात प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी ५०० कोटींचा भ्रष्टाचार केल्याचं म्हटलं होतं. यावर शिक्षण मंत्र्यांनी शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना चौकशीचे निर्देश दिले होते. त्यानुसार शिक्षण विभागाने आता राज्याच्या शिक्षण आयुक्तांना या प्रकरणात प्राथमिक चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातही बोगस शिक्षक भरतीचा भांडाफोड होणार असं सध्या तरी दिसतय.

बीड जिल्ह्यात मागील अनेक दिवसांपासून प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षण भरतीमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष सादिक इनामदार यांनी केला आहे. याबाबत त्यांनी राज्याच्या शिक्षण मंत्र्याकडं तक्रार केली आहे. यामध्ये जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी आणि माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी यांनी मोठा भ्रष्टाचार केल्याचा आरोप सादिक इनामदार यांनी केली आहे. नागपूरमध्ये शिक्षक भरती प्रकरणी चौकशी सुरू आहे. यासोबत बीड जिल्ह्यातही शिक्षक भरतीमध्ये खासगी संस्थाचालक आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमतानं कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचं पाहायला मिळत आहे, असा आरोप त्यांनी केलाय. मला जीवे मारण्याची धमकी दिली आहे. माझ्या जीवाला धोका आहे. मला काही बरे वाईट झाल्यास जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी भगवान फुलारी आणि ज्या खासगी संस्थेत भ्रष्टाचार झाला. हे या घटनेस जबाबदार राहतील, असं सादिक इनामदार यांनी म्हटलय.

उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी शिक्षण अधिकारी प्राथमिक आणि माध्यमिक यांना शासनाच्या नियमानुसार शासनाच्या अधीन राहून शिक्षक भरती संदर्भात आपल्या स्तरावर निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. परंतु, असं न करता पदाचा गैरवापर करून शासनाची फसवणूक करत करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. संस्था चालकांना कोट्यवधी रुपयांचे थकीत वेतन वितरित करून शिक्षक भरती घोटाळा आणि खासगी शिक्षण संस्थेमधून विनाअनुदानित शिक्षकांना देयके दिली आहेत.

बीड जिल्ह्यातही प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षक भरतीत मोठ्या प्रमाणावर घोटाळा झाल्याचे आरोप होत आहेत. याबाबत भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष सादिक इनामदार यांनी राज्याच्या शिक्षण मंत्र्यांकडं तक्रार केली होती. यावरून प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांच्या प्राथमिक चौकशीचे आदेश राज्याच्या शिक्षण विभागानं दिले आहेत.

# अलमट्टीबाबत तोडगा निघणार की नाही?



अशोक सुतार
८६००३१६७९८



अलमट्टी धरणाच्या उंचीचा मुद्दा नेहमीच कर्नाटक - महाराष्ट्र राज्यांच्या वादाचा केंद्रबिंदू बनलेला दिसत आहे. कर्नाटकमधील धरणाची ऊंची वाढवण्याचा निर्णय कर्नाटक सरकारने घेतला की, महाराष्ट्रातील नेते खडबडून जागे होतात. परंतु या प्रकरणी केंद्रीय बैठक घेऊन कर्नाटक - महाराष्ट्रातील वाद मिटवावा, यासाठी कोणी प्रयत्न करीत नाही, असेच दिसते. अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास राज्य सरकारचा विरोध कायम आहे. त्याबरोबरच महापूर नियंत्रणाला प्राधान्य देणार असल्याचे राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी बुधवारी आयोजित बैठकीत सांगितले. अलमट्टी धरणाच्या उंचीविरोधात कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधी आणि कृती समितीने मांडलेल्या मुद्द्यांचा विचार करून येत्या १५ दिवसांत सर्वपक्षीय बैठक घेतली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, नुकत्याच झालेल्या बैठकीत कोणताही तोडगा निघाला नाही.

या बैठकीत बोलताना, कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांतील महापुरास अलमट्टी जबाबदार नाही, अशी भूमिका प्रशासनाने घेतली. त्याला उपस्थित संघटनांच्या प्रतिनिधींनी जोरदार आक्षेप घेतला. विविध मुद्द्यांवर पुराव्यांसह महापुराला अलमट्टी कशी जबाबदार आहे, हे सांगण्यात आले. त्यावर मंत्री विखे- पाटील यांनी आंदोलकांनी, लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या मुद्द्यांचा पूर्ण अभ्यास करा. यानंतर येत्या १५ दिवसांत सर्वपक्षीय बैठक घेऊ, असेही सांगितले. प्रशासनाने या प्रकरणी, अलमट्टी धरणात पाण्याची साठवणूक केल्यामुळे पावसाळ्यात सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात पूरपरिस्थिती निर्माण होते, हे किमान मान्य तरी केले पाहिजे होते. परंतु प्रशासनाने तेही मान्य केले नाही.

दरवर्षी पावसाळ्यात पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा, पंचगंगा नद्यांना महापुराचा धोका उद्भवत आहे. यापूर्वी असे चित्र नव्हते. मग आता असे चित्र दिसण्याची कारणे काय आहेत ? कर्नाटक राज्य अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याच्या हट्टाला पेटले आहे. त्यामुळे पूरग्रस्त भागातील काही आमदार व खासदारांच्या बैठकीत असे ठरले की, अलमट्टी धरणाची उंची वाढविण्याच्या कर्नाटकच्या हट्टाला विरोध करण्यासाठी सांगली, कोल्हापूरमध्ये बंद पाळला पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अरूण लाड यांनी आयोजित केलेल्या या बैठकीकडे दोन महिन्यांपूर्वी पूरग्रस्त भागातील खासदार वगळता अन्य लोकप्रतिनिधींनी पाठ फिरवली. त्यामुळे पावसाळ्यातील महापुराबाबत काही लोकप्रतिनिधींना चिंता वाटत नसल्याचे दिसून आले. राज्य सरकारमधील प्रतीनिधींनी अलमट्टीच्या मुद्दयाकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे, असे वाटते.

अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय कर्नाटक सरकारने घेतला. याविरोधात सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधींनी चक्काजाम आंदोलन केले होते. या सर्व पार्श्वभूमीवर विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीला कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री तथा सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर, डॉ. विनय कोरे, अमल महाडिक, अशोकराव माने, सत्यजित देशमुख, सुहास बाबर, गोपीचंद पडळकर, इद्रिस नायकवडी, सुधीर गाडगीळ, माजी आमदार उल्हास पाटील, प्रकाश आवाडे आदींसह महापूर नियंत्रण कृती संघर्ष समितीचे अध्यक्ष सर्जेराव पाटील, इरिगेशन फेडरेशनचे विक्रांत पाटील, आंदोलन अंकुशचे धनाजी चुडमुंगे आदी प्रमुख उपस्थित होते.

या बैठकीपूर्वी जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकार्यांनी आंदोलकांसमवेत कोल्हापुरात बैठक घ्यावी, असे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले. विखे-पाटील यांनी म्हटले की , अलमट्टी धरणासंदर्भात राज्य शासनाने न्यायालयात आपली बाजू भक्कमपणे मांडली आहे. केंद्रीय जलशक्तिमंत्र्यांनाही याबाबत विनंती केली आहे. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांतील पूर नियंत्रणासाठी प्राधान्याने उपाययोजना राबविण्यात येत आहेत. नदीची वहन क्षमता वाढविण्यासाठी नदीतील गाळ काढण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांत पुरामुळे होत असलेले नुकसान टाळण्यासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने पुराचे पाणी दुष्काळी भागात वळविण्यासाठी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून ८० ते ८५ टीएमसी पुराचे पाणी वळविले जाणार आहे. यामुळे कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांतही पुराची तीव्रता कमी होण्यास मदत होईल, असेही विखे-पाटील यांनी सांगितले.

आबिटकर म्हणाले, कृष्णा खोर्यातील जादाचे पाणी दुष्काळी भागाकडे वळवून पुराची तीव्रता कमी करण्याला सरकारचे प्राधान्य आहे. त्या कामाला सरकारने गती दिली असून, त्यांची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. यामुळे कोल्हापूर, सांगली भागात व पाणलोट क्षेत्रात जे पाणी येत आहे ते सर्व पाणी त्या त्या ठिकाणच्या नदीपात्रात थांबविण्यासाठी चांगले नियोजन केले जाणार आहे. आपण न्यायालयात गेलो नाही, असा काहींचा संभ्रम होता; पण आपली कायदेशीर लढाई सुरूच असून, जनतेच्या हितासाठी अजून जी कायदेशीर भूमिका घ्यावी लागेल ती घेतली जाईल. बैठकीला जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले आणि अधिकारी वर्ग उपस्थित होता.

सन २०१७, २०१९ व २०२२ ला पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा नदीला आलेल्या महापुरामध्ये महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी, कराड यांसारख्या शहरांचे तसेच नदीकाठावरील गावांचे झालेले नुकसान झाले होते. ही शहरे आणि नदीकाठाची गावे पावसाळ्यात जलमय होतात. एवढेच नव्हे तर नदीकाठच्या शहर आणि गावांत पुराचे पाणी नागरी वस्तीत जाऊन धोका निर्माण होतो. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री शिवकुमार यांनी अलमट्टी धरणाची उंची ५ मीटरने वाढवून ५२४ मीटर करण्यात येईल असे सांगत तसा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला असल्याचे म्हटले होते. विशेष म्हणजे, अलमट्टी धरणाची उंचीवाढ करण्यास कृष्णा खोरे पाणी वाटप लवादाने मान्यता दिली असल्याचे शिवकुमार यांनी म्हटले होते. अलमट्टी धरणाची उंचीवाढ झाली तर धरणातील 'बँक वॉटर'मुळे पावसाळ्यात नदीला आलेल्या पुराच्या पाण्याचा निचरा होण्यास वेळ लागणार असून याचा मोठा फटका कृष्णासह वारणा, पंचगंगाकाठी असलेल्या गावांना व शेतीला बसणार आहे. राज्य शासनाने याचा विचार करून कर्नाटक सरकारच्या, अलमट्टी धरणाच्या उंचीवाढीला विरोध करायला हवा, असे वाटते. कृष्णा खोरे पाणी वाटप लवादाने महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यांना विश्वासात न घेता कर्नाटकला पाच मीटरने अलमट्टीची उंची वाढविण्यास परवानगी कशी दिली ? हा प्रश्न अनुत्तरीत राहणार आहे.

महापुरामध्ये सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी यांसारख्या शहरांचे तसेच नदीकाठावरील गावांचे झालेले नुकसान यांचा अभ्यास अहवाल राज्य सरकारने केंद्र सरकारकडे सादर केला पाहिजे. त्याशिवाय या समस्येची गंभीरता केंद्र सरकारला समजणार नाही.

# हगवणेंचे मित्र, नातेवाईक पोलिसांच्या रडारवर!
# सुनील चांदेरे यांच्यासह अनेकांची चौकशी

पिंपरी । प्रतिनिधी

वैष्णवी हगवणे संशयास्पद मृत्यू प्रकरणी पोलिसांनी तपासाची चक्र वेगाने फिरवली असून, हगवणे कुटुंबाच्या नातेवाईक, मित्रपरिवारातील अनेक जणांची सखोल चौकशी सुरू केली आहे. यामध्ये पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांचीही चौकशी करून माहिती घेण्यात आली आहे.

राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी हगवणे हिने १६ मे रोजी भुकूम येथील घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. छळामुळे आत्महत्या केल्याचा आरोप करत तिच्या वडिलांनी बावधन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.


**सासरा आणि दीर, दोघे अजून फरार**

वैष्णवीचा पती शशांक, सासू लता आणि नणंद करिष्मा हगवणे यांना अटक झाली असून, सासरे राजेंद्र व दीर सुशील हगवणे हे फरार आहेत.

**मित्र आणि नातेवाईकांच्या मागे चौकशीचा ससेमिरा**

या प्रकरणातील फरार संशयितांचा ठावठिकाणा शोधण्यासाठी पोलीस विविध पथकांच्या माध्यमातून तपास करत आहेत. त्यांचा संपर्क कुणाशी झाला होता, लपण्यास कुणाची मदत झाली असावी, यासंदर्भात माहिती मिळवण्यासाठी नातेवाईक, ओळखीचे, राजकीय आणि व्यावसायिक वर्तुळातील व्यक्तींना चौकशीसाठी बोलावले जात आहे.





सुनील चांदेरे यांच्याकडेही चौकशी करताना विचारण्यात आले की, राजेंद्र किंवा सुशील हगवणे यांच्याशी त्यांचा प्रकरणानंतर काही संपर्क झाला होता का? त्यांनी चौकशीदरम्यान आपला जबाब नोंदवला असून, अधिक तपशील पोलीस तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, पोलीस तपास अधिक सखोल व वेगाने करत असून लपवाछपवी करणाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे संकेत पोलिस सूत्रांकडून देण्यात आले आहेत.

वैष्णवीच्या नातेवाईकांनी संशयितांवर खुनाच्या कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी लावून धरली आहे.

**पोलीस आयुक्तालयात तातडीची बैठक**

फरार संशयित राजेंद्र हगवणे याला अटक करणे हे पिंपरी-चिंचवड पोलिसांसाठी आव्हानात्मक बनले आहे. त्यामुळे गुरुवारी (२२ मे) पोलीस आयुक्तालयात यासंदर्भात तातडीची उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली.

या बैठकीत आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला. स्थानिक पोलिसांबरोबरच गुन्हे शाखेची सर्व पथके राजेंद्र हगवणे आणि त्याचा मुलगा सुशील हगवणे यांच्या शोधासाठी रवाना करण्यात आली आहेत.

**पाच पथके घेताहेत राजेंद्र हगवणेचा शोध**

स्थानिक पोलिसांसोबतच पाच विशेष पथकेही वेगवेगळ्या दिशांनी शोध मोहीम राबवत आहेत. राजेंद्र हगवणे व सुशील हगवणे यांना लवकरच अटक करण्यात येईल, अशी माहिती पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी दिली.

## 'नणंद आणि दिराने चारित्र्यावर संशय घेतला, तर सासऱ्यांनी' हगवणे यांच्या थोरल्या सुनेने केले गंभीर आरोप

पिंपरी । प्रतिनिधी

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणामध्ये आता एका पाठोपाठ एक धक्कादायक माहिती समोर येत आहे. हुंड्यासाठी वैष्णवी हिचा झालेला छळ, मारहाण आदींबाबत तिच्या माहेरच्या मंडळींनी गंभीर आरोप केल्यानंतर आता वैष्णवी हिची जाऊ आणि हगवणे कुटुंबातील थोरली सून असलेल्या मयुरी हगवणे हिनेही कुटुंबीयांवर गंभीर आरोप करत झालेल्या छळाचा पाढा वाचला आहे.

मयुरी हगवणे हिने सांगितले की, २०२२ साली माझं लग्न सुशील हगवणे यांच्यासोबत झालं होतं. लग्नानंतर माझी नणंद, माझा दीर आणि माझी सासू हे कायम माझा छळ करत होते. माझी सासू कधी माझ्यासोबत चांगली वागली तर माझी नणंद तिला म्हणायची की तू तिचे लाड का करतेस, तिचे लाड नाही करायचे, तू तिच्यासोबत असं वाग, तसं वाग म्हणून सांगायची. छोट्या छोट्या गोष्टींवरून त्रास दिला जायचा. मात्र सर्वात चांगली गोष्ट म्हणजे माझ्या पतींचा मला पाठिंबा होता. पण कुटुंबीयांनी माझ्यावरून त्यांनाही खूप त्रास दिला. त्यांनी त्यांच्या मुलालाही सोडलं नाही.



गेल्या दीड वर्षापासून आम्ही वेगळे राहतोय. माझ्या नणंदेने आणि माझ्या दिराने माझ्या चारित्र्यावर संशय घेतला आहे, सासऱ्यांनी माझ्यावर हात टाकलेला होता. आम्ही त्यांच्यापासून वेगळं राहण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी तेही यशस्वी होऊ दिलं नाही. प्रत्येक बाबतीत आम्हाला त्रास दिला जात होता. काही व्यवहार करायचा झाला तर दीर आणि सासरे अडथळे आणायचे. आम्ही त्यांच्या पायाकडे आलं पाहिजे, अशी त्यांची वृत्ती होती, पण आम्ही त्यांच्यासोबत राहिलो नाही, असा आरोपही मयुरी हगवणे हिने केला आहे.

## 'अलमट्टी'च्या उंचीला विरोध कायम ; पण महापूर नियंत्रणाला प्राधान्य

मुंबई । प्रतिनिधी

अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास राज्य सरकारचा विरोध कायम आहे. त्याबरोबरच महापूर नियंत्रणाला प्राधान्य देणार असल्याचे राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी बुधवारी आयोजित बैठकीत सांगितले. अलमट्टी धरणाच्या उंचीविरोधात कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधी आणि कृती समितीने मांडलेल्या मुद्द्यांचा विचार करून येत्या १५ दिवसांत सर्वपक्षीय बैठक घेतली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, आजच्या बैठकीत कोणताही तोडगा निघाला नाही.

कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतील महापुराला कारणीभूत ठरणार्या अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय कर्नाटक सरकारने घेतला आहे. त्याची तयारीही कर्नाटक सरकारने केली आहे. याविरोधात सांगली व कोल्हापूर जिल्ह्यांत आंदोलन सुरू आहे. या दोन्ही जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधींनी चक्काजाम आंदोलनही केले होते. या सर्व पार्श्वभूमीवर विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीला आरोग्यमंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री तथा सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आमदार सर्वश्री राजेंद्र पाटील-यड्रावकर, डॉ. विनय कोरे, आदींसह महापूर नियंत्रण कृती संघर्ष समितीचे अध्यक्ष सर्जेराव पाटील, इरिगेशन फेडरेशनचे विक्रांत पाटील, 'आंदोलन अंकुश'चे धनाजी चुडमुंगे आदी प्रमुख उपस्थित होते.

पान १ वरुन

### शेतकऱ्यांना बियाणे, खते

मीडियाने विचारले, तुम्ही म्हणाले होते, 'जहा नही चैना वहा नही रेहेना' मग मी म्हणालो 'देर आये दुरुस्त आये' काही लोक थोड्या वेळ या घरात तर थोड्या वेळ त्या घरात असतात, अशा लोकांना हे दुःख कळणार नाही. मागच्या मंगळवारी आमची बैठक झाली आणि तेव्हाच ठरलं होतं की शपथ घ्यायची आहे, पण मी कोणालाच नाही सांगितलं, असा गौप्यस्फोट यावेळी भुजबळ यांनी केला आहे.

ते पुढे म्हणाले, मोदी साहेब आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यावेळीच सांगितलं होतं की दुरुस्त करायला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रयत्न केले.

माझ्या पेक्षा जास्त आनंद तुम्हा सगळ्यांना झाला, हा साप शिडीचा खेळ आहे. थोडं वर गेलं की खाली देखील येतं. चालूच असतं, त्याला कोण काय करणार. कधीकधी अशा गोष्टी पण घडतात ज्याचा तुम्ही कधी विचारही केलेला नसतो. असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं.

**राष्ट्रवादी पक्षांतर्ग नाराजी पसरली.**

छगन भुजबळ यांना मंत्रिपद दिल्यामुळे राष्ट्रवादी पक्षांतर्ग नाराजी पसरली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. काल झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बैठकीत अनेक आमदारांनी दांडी मारली होते. वारंवार भुजबळांनाच संधी दिली जात असल्याने पक्षातील नेते नाराज असल्याचे बोलले जात आहे. फडणवीस सरकारमध्ये डावलण्यात आलेले माजी मंत्री आणि मंत्रीपदाची अपेक्षा बाळगून असलेले आमदार देखील नाराज असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

## थोडक्यात

### हगवणे प्रकरणातील फरार आरोपींना तातडीने अटक करा - अदिती तटकरे

मुंबई । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यात कसपटे कुटुंबाने जे काही सहन केले आहे तसेच अजून ज्या कोणत्या बाबी तक्रारीत नमूद करायच्या राहिल्या असतील त्या बाबींचा समावेश करत या केसला अजून कसे मजबूत करता येईल ते बघता येईल. परंतु त्या आधी दोन आरोपी जे फरार आहेत त्यांना पोलिसांनी तातडीने अटक करावी, अशी प्रतिक्रीया वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या व मंत्री अदिती तटकरे यांनी दिली.

तटकरे म्हणाल्या, दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही केस स्ट्राँग झाली पाहिजे. त्यासाठी आणखी काही विटनेस किंवा जे इतर लोक असतील की ज्यांना असा अनुभव आला असेल त्यांनी त्यांच्या बाबी समाविष्ट करायला पाहिजे. आरोपींना कठोर शिक्षा कशी करता येईल या दृष्टीने शासनाच्या आणि पोलिसांकडून प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.

### न्यायालय बघ्याच्या भूमिकेत राहू शकत नाही

मुंबई । प्रतिनिधी

हृदयविकाराच्या झटक्याने मेंदूला झालेल्या दुखापतीमुळे अंथरुणाला खि ळलेल्या ७३ वर्षीय वडिलांचा सांभाळ करण्यासाठी उच्च न्यायालयाने दोन मुलींना कायदेशीर पालक म्हणून नियुक्त केले. स्वतःचा सांभाळ करु न शकणाऱ्या व्यक्तींसाठी सरकारने पालक बनले पाहिजे. अशा व्यक्तींच्या वेदना पाहून न्यायालय केवळ बघ्याच्या भूमिकेत राहू शकत नाही, असे मत नोंदवत न्यायमूर्ती अभय अहुजा यांनी वृद्धाच्या बाबतीत संवेदनशील भूमिका घेतली.

मानसिक दुर्बलतेमुळे ७३ वर्षीय वृद्ध अर्धबेशुद्ध अवस्थेत आहे. ते स्वतःची काळजी घेऊ शकत नाही, त्यांच्या मालमत्तेचे व्यवस्थापन करू शकत नाही, असे निरीक्षण न्यायालयाने निकालपत्रात नोंदवले आहे. वडिलांची गंभीर परिस्थिती पाहून मुलींनी पालक आणि वॉर्ड्स कायद्याअंतर्गत न्यायालयात दाद मागितली होती. हा कायदा केवळ अल्पवयीन मुलांसाठी पालकांची नियुक्ती करण्यास परवानगी देतो. कायद्याच्या या मयदिकडे लक्ष वेधतानाच मुलींनी न्यायालयाला आपल्या वडिलांच्या वैद्यकीय स्थितीचा सहानुभूतीने विचार करण्याची विनंती केली होती.

वडिलांची स्थिती पाहता त्यांना मानसिका आरोग्य सेवा कायद्याअंतर्गत 'मानसिक आजार' म्हणून पात्र ठरते. ती स्थिती व्यक्तीची निर्णय क्षमता तसेच कामे करण्याची क्षमता लक्षणीयरित्या बिघडवते, असेही न्यायमूर्ती अहुजा यांनी नमूद केले.

न्यायालयीन हस्तक्षेप आवश्यक

याचिकाकर्त्या मुलीच्या वृद्ध पित्याला २०२४ च्या सुरुवातीला हृदयविकाराचा झटका आला होता. त्यादरम्यान त्यांच्या मेंदूला ऑक्सिजन आणि रक्तपुरवठा कमी झाला. यामुळे वृद्धाच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली. त्यात ते अर्थवेशुद्ध होऊन मागील वर्षभरापासून अंथरुणाला खिळलेले आहेत. तेव्हापासून त्यांना दैनंदिन गरजांसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागत आहे, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले. न्यायालयाने याचिकेत तथ्य असल्याचे नमूद केले. अशा प्रकरणांमध्ये असहाय्य व्यक्तींच्या हिताचे रक्षण करण्यासाठी न्यायालयीन हस्तक्षेप आवश्यक आहे, असे न्यायालय स्पष्ट केले.

# शासकीय विश्रामगृहात सापडलं जवळपास दोन कोटींचं घबाड; विधिमंडळाचे संशयित कक्ष अधिकारी निलंबित

धुळे । प्रतिनिधी

गुलमोहर शासकीय विश्रामगृहात जवळपास दोन कोटींचं घबाड सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी संशयित कक्ष अधिकारी किशोर पाटील यांना निलंबित करण्यात आले असून संपूर्ण प्रकरणाची चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.

यासंदर्भात विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या कार्यालयाकडून अधिकृत माहिती देण्यात आली आहे.

विधीमंडळाची अंदाज समिती धुळे आणि नंदुरबार जिल्ह्याच्या दौऱ्यावर होती. या समितीमधील एकूण २२ आमदारांचं शिष्टमंडळ विकासकामांचा आढावा घेण्यासाठी दौऱ्यावर होते. यापैकी ११ आमदारांचं शिष्टमंडळ धुळ्यातील गुलमोहर शासकीय विश्रामगृहात थांबलं होतं. याच शासकीय विश्रामगृहाच्या रुम नंबर १०२ मधून पोलिसांनी १ कोटी ८४ लाख ८४ हजार २०० रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे. महत्त्वाचे म्हणजे माजी आमदार अनिल गोटे यांनी हा सर्व प्रकार उघडकीस आणला आहे. अनिल गोटे तब्बल चार तास खोलीच्या बाहेर जाऊन बसले होते. त्यानंतर पीडब्ल्यूडीचे अधिकारी आणि तहसीलदार यांच्या उपस्थितीत ही खोली उघडण्यात आली. पोलिसांनी खोलीतील सर्व रक्कम जप्त केली आहे.

अनिल गोटे म्हणाले की, समितीतील ११ आमदारांना देण्यासाठीच हे पैसे जमा केले होते. ज्या खोलीत पैसे सापडले, ती १०२ क्रमाकाची खोली किशोर पाटील यांच्य नावावर बुक होती. किशोर पाटील हे अंदाज समितीचे अध्यक्ष आमदार अर्जुन खोतकर यांचे खासगी पीए आहेत. शिवसैनिकांनी धडक देताच खोतकरांचे पीए खोलीला कुलूप लावून पळून गेले. दरम्यान, आता जप्त करण्यात आलेली रक्कम १०२ क्रमाकाच्या खोलीमध्ये कशी आली, याचा तपासा करावा, अशी मागणी अनिल गोटे यांनी केली आहे.

# अवकाळी पावसाने झालेल्या शेत पिकाच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा-मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात गत काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेत पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले.

मंत्री श्री. जाधव-पाटील म्हणाले, नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांप्रती राज्य शासन संवेदनशील आहे. एप्रिल व मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेत पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी. यासाठी शेत पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. पंचनामे करण्यासाठी महसूल व कृषी विभागाने पथके गठीत करून ही कार्यवाही गतीने पूर्ण करावी.

मंत्री जाधव-पाटील म्हणाले, अतिवृष्टी, पूर, अवेळी पाऊस, दुष्काळ, वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यास शासन नेहमीच प्राधान्य देत आहे. विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी सन २०२३- २०२४ या वर्षात ५४ लाख ८० हजार पात्र शेतकऱ्यांना ४ हजार ८३३ कोटी (चार हजार आठशे तेहतीस कोटी ) रूपये तर २०२४- २०२५ या आर्थिक वर्षात ६९ लाख ३ हजार शेतकऱ्यांना ६ हजार ९८९ कोटी (सहा हजार नऊशे एकोणनव्वद) आणि १ एप्रिल २०२५ ते आतापर्यंत ९ लाख ७ हजार शेतकऱ्यांना ९७५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री जाधव-पाटील यांनी सांगितले.

# जम्मू काश्मीर: दहशतवाद्यांशी लढताना महाराष्ट्राचे सुपुत्र जवान संदीप गायकर यांना वीरमरण

सिंगपोरा । वृत्तसेवा

जम्मू-काश्मीरच्या किश्तवाडमधील चतरू येथील सिंगपोरा भागात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये गुरुवारी चकमक झाली. या चकमकीत महाराष्ट्राचे सुपुत्र जवान संदीप पांडुरंग गायकर यांना वीरमरण आले. गायकर यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी अहिल्यानगरातील अकोले येथील ब्राम्हणवाडा येथे उद्या आणण्यात येणार आहे.

शहीद जवान संदीप गायकर हे महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातल्या करंडी गावचे रहिवासी होते. अवघ्या नऊ महिन्यांपूर्वी त्यांनी मराठा रेजिमेंटच्या आरआर बटालियनमध्ये लष्करी सेवेत प्रवेश केला होता. गुरुवारी दहशतवाद्यांशी लढताना ते शहीद झाले. गायकर यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी अहिल्यानगरातील अकोले येथील ब्राम्हणवाडा येथे उद्या आणण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात आई-वडील , पत्नी आणि मुलगी आहे. त्यांच्या वीरमरणाची बातमी पोहोचताच गावात शोककळा पसरली.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास किश्तवाडच्या सिंहपोरा-छत्रू परिसरात लष्कराच्या दोन पॅरा एसएफ, ११ आरआर, सातवी आसाम रायफल्स आणि स्थानिक पोलिसांच्या विशेष गट एसओजीने संयुक्त कारवाई सुरू केली. दहशतवाद्यांच्या गटाला घेरून शोधमोहीम सुरू असताना अचानक गोळीबार सुरू झाला. चकमकीत जवान संदीप गायकर गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी हलवण्यात आले, पण उपचारादरम्यान त्यांना वीरमरण आले.

भारतीय लष्कराच्या व्हाइट नाइट कोअरने सोशल मीडियावर चकमकीची माहिती दिलीय. त्यात एक जवान शहीद झाल्याचे सांगितले. गुरुवारी सकाळी किश्तवाडच्या छत्रू येथे पोलिसांसोबत संयुक्त मोहिम राबवत होते. त्यावेळी दहशतवाद्यांसोबत चकमक झाली. अजूनही गोळीबार सुरू आहे. या गोळीबारात एक जवान गंभीर जखमी झाला होता. पण उपचारादरम्यान त्याला वीरमरण आले असे, व्हाइट नाइट कोअरने सांगितले आहे.

# धुळे विश्रामगृह रोकड प्रकरण : सरकार आणि समितीला बदनाम करण्याचा विरोधकांचा डाव, अर्जुन खोतकरांचा पलटवार

धुळे । प्रतिनिधी

विधिमंडळ आमदाराच्या समितीतील सदस्यांना देण्यासाठी साडेपाच कोटी रुपये विश्रामगृहात ठेवल्याचा आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी केला. याप्रकरणी माजी आमदार अनिल गोटे यांनी बुधवारी रात्री उशीरापर्यंत संबंधीत कुलूप बंद खोली बाहेर ठिय्या मांडला. त्यानंतर रात्री उशिरा या खोलीचं इन कॅमेरा कुलुप उघडून तपासणी सुरू होती. त्यांच्या आरोपानंतर धुळ्यातील गुलमोहर या विश्रामगृहाच्या खोली क्रमांक १०२ ची झडती घेतली असता, त्यात १ कोटी ८४ लाख ८४ हजार रुपये जप्त करण्यात आले. या प्रकरणी आता समितीचे अध्यक्ष आमदार अर्जुन खोतकर यांनी पलटवार केला आहे. सरकार आणि समितीला बदनाम करण्याचा विरोधकांचा डाव असल्याचा आरोप खोतकर यांनी केला.

धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांच्या कामाचा आढावा घेण्यासाठी आमदार अर्जुन खोतकर यांच्या अध्यक्षतेत बुधवारी आमदारांची समिती अभ्यास दौऱ्यावर धुळ्यात आली. धुळ्यात बुधवारी सकाळी समितीचे २९ पैकी ११ आमदार दाखल झाले आहेत. या समितीतील आमदारांना देण्यासाठी अधिकारी यांनी पाच कोटी रुपये गोळा केले. विश्रामगृहाच्या १०२ क्रमांकाच्या खोलीत ठेवले आहेत, असा आरोप गोटे यांनी केला. परंतु सदर ठिकाणी चौकशी केली असता सदर खोली क्रमांक १०२ मधून एक कोटी ८४ लाख ८४ हजार रुपये आढळून आले. यामुळे धुळे शहरात एकच खळबळ उडाली.

**विरोधकांचा सरकार आणि समितीला बदनाम करण्याचा डाव**

धुळे गुलमोहर शासकीय विश्रामगृहात सापडलेल्या रकमेच्या घटनेप्रकरणी अंदाज समितीचे अध्यक्ष आमदार अर्जुन खोतकर यांनी सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. विरोधकांचा हा डाव असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे. आपला स्वीय सहाय्यक त्या रूममध्ये राहत नव्हता, तो बाजूच्या रूममध्ये राहत असल्याचं देखील स्पष्टीकरण अर्जुन खोतकर यांनी दिलं आहे. माजी आमदार अनिल गोटे यांचे आरोप करण्याची ही जुनी सवय असल्याची देखील प्रतिक्रिया अर्जुन खोतकर यांनी व्यक्त केली आहे. सरकारला आणि समितीला बदनाम करण्याचा विरोधकांचा डाव आहे. समितीला आणि राज्य सरकारला बदनाम करण्याचा डाव असल्याचा आमदार अर्जुन खोतकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

# पुढील तीन दिवस पूर्वमोसमी पाऊस धुमाकूळ घालणार

**मुंबई । प्रतिनिधी**

मागील दोन दिवसांपासून राज्यातील अनेक भागांना (चरपीप ठरळप) पूर्वमोसमी पावसाने झोडपून काढले आहे, मात्र अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने पुढील तीन दिवस राज्यात पावसाचा जोर वाढणार आहे. हवामान विभागाने काही जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला आहे. कोकण किनारपट्टी भागात ताशी ४५ ते ५५ किमी वेगाने वारे वाहणार आहे त्यामुळे मच्छीमारांना आणि स्थानिक नागरिकांना खबरदारीचा इशारा देण्यात आला आहे.

दोन दिवसांपासून पूर्वमोसमी पावसाने दमदार हजेरी लावली. कोकणासह (चरपीप ठरळप)राज्याच्या अनेक भागांना तर अक्षरशः झोडपून काढले. पुणे आणि मुंबईतही पावसाने थैमान घातले. परिसरात पावसाने विश्रांती घेतली.मात्र गुरुवारपासून आणखी तीन दिवस पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. कोकण किनारपट्टी आणि अरबी समुद्राजवळ कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे. त्याचा परिणाम मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात दिसून येत आहे. पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्टासह विदर्भाती अनेक जिल्ह्यांत सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांना २२ मे रोजी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज आहे. छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, बीड, (इशशव)परभणी, नांदेड आणि जालना या जिल्ह्यांना २२ मे रोजी यलो अलर्ट देण्यात आला आहे.

# छळाच्या तक्रारीची दखल न घेणे ही गंभीर बाब, हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कारवाई करणार; आदिती तटकरे

पिंपरी । प्रतिनिधी

हगवणे कुटुंबातील मोठ्या सुनेने छळाबाबत सहा महिन्यांपूर्वीच महिला आयोगाकडे तक्रार केली होती. मात्र, आयोगाने त्याकडे दुर्लक्ष केले, असा आरोप करण्यात येत आहे. त्याचवेळी या तक्रारीची योग्य दखल घेतली असती तर त्यांना न्याय मिळाला असता. मात्र, यात कुचराई किंवा हलगर्जी करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.




मंत्री आदिती तटकरे यांनी गुरुवारी दुपारी वाकड येथे वैष्णवी हगवणे हिच्या आईवडिलांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर आदिती तटकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. मंत्री तटकरे म्हणाल्या, ''कस्पटे कुटुंबाला न्याय देणे आवश्यक आहे. त्यांनी तक्रार केली असली तरी आणखी काही मुद्दे ते तक्रारीत नमूद करू शकतात. जेणेकरून ही केस स्ट्राँग झाली पाहिजे. संशयितांना कडक शिक्षा होण्यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता शासनाकडून केली जाणार आहे. हगवणे यांच्या मोठ्या सुनेने केलेल्या तक्रारीची दखल न घेणे ही गंभीर बाब आहे. महिला आयोगामधील कोणी किंवा पोलिसांनी यात हलगर्जीपणा केला असल्यास त्याबाबत चौकशी करण्यात येईल.''

# हुंडा मागणाऱ्या लोकांवर मुलींनी थुंकायला हवं, छळ करणाऱ्यांना जिवंतू सोडू नये; अंबादास दानवेंचा संताप

धाराशिव । प्रतिनिधी

पुण्यात हुंड्यासाठी सासरच्या मंडळींकडून छळ होऊन मृत्यू झालेल्या वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर महाराष्ट्रभरातून संताप व्यक्त केला जात आहे. या घटनेनंतर सर्वच राजकीय पक्षातील महिला नेत्या आक्रमक झाल्या असून राज्य व राष्ट्रीय महिला आयोगानेही या घटनेची दखल घेत अहवास सादर करण्याचे निर्देश पोलीस प्रशासनाला दिले आहेत.

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील राजेंद्र हगवणेंची पक्षातून हकालपट्टी केली असून पीडित वैष्णवीच्या वडिलांसोबत फोनवरुन संवाद साधत धीर दिला. मात्र, या घटनेमुळे पुन्हा एकदा हुंडाबंदी कायदा आणि राज्यात हुंड्यासाठी महिलांवर होणारे अत्याचार हा विषय चर्चेत आला आहे. राज्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी देखील या घटनेवर भाषय करताना परखड मत व्यक्त केलं. हुंडा मागणाऱ्या लोकांवर मुलींनी थुंकलं पाहिजे, अशा शब्दात अंबादास दानवे यांनी आपली संतापजनक भूमिका मांडली.



धाराशिवमध्ये तुळजाभवानीच्या दर्शनाला आलेल्या अंबादास दानवेंनी पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्येच्या घटनेबद्दल संतप्त भावना व्यक्त केल्या. राजकारणाच्या पलीकडे जाऊन या गोष्टीचा आपण विचार करायला हवा. आपण फुले-शाहू-आंबेडकरांच्या सुधारणावादी महाराष्ट्रात राहतोय. पुण्यासारख्या शहरात अशी घटना घडणे हे चीड येणारं आहे. मुलींनी हुंडा घेणाऱ्यांशी लग्नच करू नये, अशा लोकांवर थुंकायला हवं, हुंड्यासाठी असा छळ करणाऱ्यांना जिवंत सोडू नये, अशी संतप्त भावना दानवेंनी व्यक्त केली. कोट्यावधी रुपये देऊनही मुलींचा छळ होत असेल तर लोकांनी पैसा आणायचा कोठून? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

**वैष्णवीला न्याय मिळवून देणार - अजित पवार**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वैष्णवीच्या वडिलांसह कस्पटे कुटुंबीयांशी फोनवरून संवाद त्यांना धीर दिला. तसेच, लग्नाच्या वेळी मला कल्पना दिली असती तर मी लग्नच होऊ दिलं नसतं. मात्र, आता वैष्णवीला न्याय मिळवून देणार, असं आश्वासन अजित पवार यांनी वैष्णवीच्या आई-वडिलांना दिलं आहे. तसेच, मी आज बारामतीमध्ये आहे पण उद्या किंवा परवा पुण्याला आल्यानंतर मी तुम्हाला भेटने. मी मुलीच्याच बाजूने आहे, पहिल्या दिवशीपासून मी पोलिसांना याबाबत आदेश दिले आहेत. मी तुमच्याच पाठीशी आहे, असे अजित पवार यांनी वैष्णवीच्या वडिलांशी फोनवरुन बोलताना म्हटले.

# राष्ट्रवादी गुंडांची टोळी, उपमुख्यमंत्री अजित पवार या टोळीचे आका आहेत का?-हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई । प्रतिनिधी**

भाजप महायुतीच्या सत्ताकाळात राज्यात गुन्हेगारीने नवा उच्चांक गाठला आहे. बहुतांश गुन्हेगारी घटनांतील आरोपी हे सत्ताधारी पक्षाशी संबंधित असून त्यांना सरकारचे अभय असल्याचे वारंवार दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांत राज्यात घडलेल्या विविध गुन्हेगारी कृत्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या पक्षाशी संबंधित लोकांचा मोठा सहभाग दिसून आला आहे, हे अत्यंत गंभीर असून राष्ट्रवादी काँग्रेस ही गुंडांची टोळी आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे या टोळीचे आका आहेत का? असा संतप्त सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

गांधीभवन येथे पत्रकार परिषदेत बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, बीडच्या मस्साजोगच्या घटनेतील आरोपी, पुण्याच्या पौर्शे कार ड्रंक न्ड ड्राईव्ह प्रकरणातील आरोपी, कोयता गँग, शेल्टर होमच्या नावाखाली तरुणींच्या लैंगिक करणारा शंतनू कुकडे, त्याचा सहकारी राष्ट्रवादीचा दीपक मानकर आणि वैष्णवी हगवणे या भगिणीचा हुंड्यासाठी छळ करून तिचा जीव घेणारे राजेंद्र हगवणे हे सर्व आरोपी राष्ट्रवादीशी संबंधित आहेत. या सगळ्या प्रकरणातले आरोपी अजित दादांच्या पक्षातलेच कसे ? असा संतप्त सवाल करून या सगळ्या गुंडांचे पालकत्व सत्ताधा-यांनी घेतले आहे, त्यामुळे अशी घृणास्पद कृत्ये करण्याची यांची हिंमत होते का? या संपूर्ण प्रकरणात राज्य महिला आयोगाचा असंवेदनशीलपणा पुन्हा दिसून आला आहे. महिला आयोगाने



वेळीच दखल घेतली असती तर एक निष्पाप जीव वाचला असता पण आयोगाच्या अध्यक्षांना महिलांच्या सुरक्षेपेक्षा राजकारण चमकवण्यात जास्त रस असल्याने राज्यात महिला अत्याचाराच्या दुर्देवी घटना घडत आहेत, आम्ही आयोगाचा धिक्कार करतो.

**अर्जुन खोतकर व त्यांच्या पीएला तात्काळ अटक करा.**

राज्यातले भाजप शिंदे व अजित पवार गट महायुतीचे सरकार हे भ्रष्टाराच्या पायावर उभे असून या सरकारमधील सहभागी मंत्री, आमदारांकडून फक्त लूट सुरु आहे. धुळ्याच्या दौ-यावर असलेल्या विधिमंडळाच्या अंदाजपत्रकीय समितीचे प्रमुख आ. अर्जुन खोतकर यांच्या पीए च्या खोलीतून जवळपास दोन कोटी रुपयांची रक्कम सापडली. ही या सरकारच्या लुटीचा भक्कम पुरावा आहे. धुळे भागातील कंत्राटदारांकडून ही रक्कम उकळल्याची चर्चा आहे. आमदाराच्या पीए कडे एवढी मोठी रक्कम सापडली आहे तर आमदाराकडे किती रक्कम असेल याची आपण फक्त कल्पनाच करू शकतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा या भ्रष्टाचाराला पाठिंबा नसेल तर त्यांनी खोतकर व त्यांच्या पीएवर गुन्ह दाखल करून त्यांना तात्काळ अटक करावी. तसेच शिंदेच्या सर्व आमदारांची लाचलुचपत विभाग, ईडी व इन्कमटॅक्स कडून चौकशी करावी असे सपकाळ म्हणाले.

राज्यात अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. हजारो लाखो होक्टवरील पिके आणि फळबागांचे नुकसान झाले आहे. कांदा उत्पादक शेतक-यांना याचा मोठा फटका बसला आहे पण सरकारकडून मदत देणे दूरच साधे पंचनामे ही केले जात नाहीत. दुसरीकडे खरीप हंगाम तोंडावर आला आहे. बोगस बियाणे आणि खतांचा राज्यात सुळसुळाट झाला आहे. बियाणे आणि खतांची लिंकींग करून विक्रेत्यांकडून शेतक-यांची पिळवणूक आणि फसवणूक केली जात आहे. अशा विक्रेत्यांवर सरकारने तात्काळ कठोर करावाई करावी असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# पार्किंगची सोय नसेल तर खरेदी करता येणार नाही कार

## सरकार कठोर नियम लागू करण्याच्या तयारीत

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत कार खरेदी करणाऱ्यांचं प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलं आहे. त्यामुळे रस्त्यावरील वाहनांच्या संख्येसोबतच पार्किंगचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या समस्येला लगाम घालण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारकडून पावलं उचलण्यात येत असून, त्यामुळे कार खरेदी करणाऱ्यांसमोरील अडचणीत मात्र वाढ होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रामध्ये आता कार खरेदी करण्यासाठी इच्छूक असणाऱ्यांना कार खरेदी करण्यापूर्वी त्यांच्याकडे पार्किंग स्पेस उपलब्ध असल्याचा पुरावा द्यावा लागणार आहे.

महाराष्ट्राचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्या मध्ये या नव्या धोरणामुळे मुंबई महानगर परिसरातील वाहतूक कोंडी कमी



होण्यास मदत होऊ शकते. राज्य सरकार पार्किंग स्पेस उपलब्ध करून देण्यासाठी योजना आखत आहोत. नियमांचं पालन केलं गेलं पाहिजे. तसेच विकासकांनीही ग्राहकांना फ्लॅटसोबत पार्किंग उपलब्ध करून दिलं पाहिजे. जर कार खरेदी करणाऱ्याकडे संबंधित पालिकेकडून पार्किंगसाठी जागा उपलब्ध असल्याचं प्रमाणपत्र नसेल तर आम्ही अशा नव्या वाहनाची नोंदणी करणार नाही.

सरनाईक यांनी पुढे सांगितले की, वाढती लोकसंख्या आणि कारसाठीचं कर्ज सहज उपलब्ध असल्याने महाराष्ट्रातील रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी होत आहे. त्यामुळे शहरी भागात वाहतूक कोंडीचं संकट निर्माण झालं आहे. तसेच रस्त्यांवर वाहनांच्या गर्दीमुळे वारंवार वाहतूक कोंडी होते, असेही ते म्हणाले.

# बीड शहरातील नागरी समस्या तातडीने सोडवा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली रा.काँ.च्या शिष्टमंडळाचे सीओंचे निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नागरी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे गुरुवारी (दि.२२) केली. पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात माजी नगरसेवकांचा समावेश होता. विविध विभागांतील समस्यांवर ठोस कृती आराखडा राबवावा, असेही निवेदनात म्हटले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरातील मान्सूनपूर्व स्वच्छता, नालेसफाई, पथदिवे, रस्त्यांची दुरवस्था, पाणी पुरवठ्याची विस्कळीत व्यवस्था, अपूर्ण गाळे व बाजारपेठांची कामे, तसेच आरोग्य सुविधा आणि कर वसुलीतील अडचणी आदी मुद्द्यांवर शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना धारेवर धरले. सध्या शहरातील अनेक मुख्य नाले कचऱ्यामुळे तुंबले असून, त्यामुळे डास, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. हे नाले तातडीने यंत्राच्या सहाय्याने साफ करण्यात यावेत. तसेच, नव्या घंटागाड्या, जेसीबी व कम्पॅक्टर खरेदी करून स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

शहरातील अनेक भागांमध्ये पथदिवे बंद अवस्थेत आहेत तर काही भागांत दिवसा दिवे सुरू



असतात. हायमास्ट दिव्यांचीही अवस्था दयनिय असून, त्यांची त्वरित दुरुस्ती आवश्यक आहे. सौर ऊर्जेचा वापर वाढवून मिनी हायमास्ट दिवे, स्मशानभूमीत प्रकाशयोजना व नगरपरिषद इमारतीवर सौर प्रकल्प बसविण्याचेही सुचविण्यात आले.

पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर व्हावे, माजलगाव व बिंदुसरा प्रकल्पाच्या मदतीने नव्या पाणी योजनांचा प्रस्ताव तयार करून शासनाला सादर करावा, अशा सूचना शिष्टमंडळाने केल्या. श्रीरामनगर येथील जुन्या पाण्याच्या टाकीऐवजी नवीन टाकी उभारण्याची, तसेच अनधिकृत नळजोडण्या नियमित करून कराच्या कक्षेत आणण्याची मागणी करण्यात आली.

बांधकाम विभागाच्या कामांबाबतही विविध सूचना देण्यात आल्या. यशवंत नाट्यगृह, आंबेडकर सांस्कृतिक भवन यांची दुरुस्ती करावी, प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करावे, नव्या भाजी मंडई व गाळ्यांचे बांधकाम पूर्ण करून सुरू करावे, तसेच रस्त्यांवरील खड्डे, सिमेंट रोडच्या सांधेबांध तातडीने कराव्यात. बेघर महिला निवारा गृह व नव्या स्मशानभूमीची उभारणी गरजेची असल्याचे सांगण्यात आले.

आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुरी पडत असल्याने नव्या केंद्रांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी सूचना करताना पेठ बीड, शाहूनगर भागांसाठी आरोग्य केंद्रांची गरज अधोरेखित करण्यात आली. कर वसुलीसाठी डिजिटल पद्धतीचा वापर करून गुगल पे, गुगल पेसारखी प विकसित करावी, तसेच व्यवसायिक गाळ्यांची नव्याने नोंदणी करून नगरपरिषदेला उत्पन्न वाढवण्याचा सल्ला देण्यात आला.

शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार फायर ब्रिगेडची नवी वाहने, भुयारी गटार योजना व एसटीपीसाठी जागा निश्चित करणे, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण व मियावाकी पद्धतीने दाट लागवड करणे अशाही सूचनांचा समावेश निवेदनात करण्यात आला.

शहरातील नागरिकांनी वारंवार मांडलेल्या या समस्या तातडीने सोडवण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केली आहे.

यावेळी माजी नगरसेवक बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, भीमराव वाघचौरे, नरसिंग नाईकवाडे, सादेक जमा, भास्करराव जाधव, इकबाल शेख, विकास जोगदंड, प्रेम चांदणे, सतिश पवार, राणा चौहान, मुन्ना इनामदार, रवींद्र कदम, शुभम धुत, जैतुल्ला खान, बिभीषण लांडगे, नितिन साखरे, दत्ता जाधव, नसीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, साऊद भाई, महेश गर्जे, नागेश तांबारे, मंगेश धोंगडे, विनोद हातागळे, डॉ.रमेश शिंदे, विठ्ठल गुजर, गजानन जवकर, शुभम कातांगळे, नामदेव गायकवाड, विशाल राऊत, भीमराव दळे, दगडू म्हेत्रे, प्रकाश कानगावकर, विद्याभूषण बेदरकर, जाफर इनामदार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, नगरपरिषदेचे सर्व विभागाचे प्रमुख, नागरिक उपस्थित होते.

# भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन च्या मदतीमुळे कामाला बळकटी मिळाली-आ.संदीप क्षीरसागर

## बिंदुसरा नदी स्वच्छता आणि खोलीकरणाच्या कामातील योगदानाबद्दल आ.क्षीरसागरांकडून आभार व्यक्त

बीड । प्रतिनिधी

सध्या आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून व नगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता व खोलीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत योगदान म्हणून भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांनी स्वेच्छेने आपले योगदान देत या महत्त्वाच्या कामात हातभार लावला आहे. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मागील ३ दिवसांपासून बीड शहारातील बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता आणि खोलीकरणाचे काम आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून आणि नगरपालिकेच्या माध्यमातून युध्दपातळीवर सुरू आहे. नदीपात्राची मान्सूनपूर्व



स्वच्छता आणि खोलीकरण केल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साठवणूक तर होणारच आहे, शिवाय शहरात असलेला पुराचा धोकाही मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. पाऊस सुरू होण्यापूर्वी सदरील काम पुर्ण [illegible] माजी आ.सय्यद सलीम स्वतः कामाच्या ठिकाणी उभे राहून काम करून घेत आहेत.

दरम्यान या कामासाठी योगदान म्हणून भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन आदींनी स्वेच्छेने जेसीबी, ट्रॅक्टर इत्यादी साधनसामग्री निःशुल्क उपलब्ध करून दिली आहे. निश्चीतच यामुळे कामाची गती वाढणार असून, काम वेळेत आटोपण्यासाठी मोठी मदत होणार आहे. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी योगदान दिलेल्या भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्षशांतीलाल मुथ्था, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांसह सर्व शासकीय आणि अशासकीय संस्था, संघटनांचे आभार व्यक्त केले आहेत.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे-राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

काही दिवसांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आल्या असून या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आष्टी येथे तालुका स्तरीय बैठक बोलवण्यात आली होती. जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व प्रदेश युवक अध्यक्ष महेबूब शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. बैठकीस जिप सदस्य सतीश शिंदे, प्रदेश सचिव अ‍ॅड.नरसिंह जाधव, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, तालुका अध्यक्ष परमेश्वर शेळके,संजय थोरवे,राम खाडे, मिसाळ पाटील, मिर्झा बेग,तांबेताई यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने गर्दी केली होती.



बैठकीस संबोधित करताना राजेंद्र मस्के म्हणाले की,लोकसभा व विधानसभा निवडणुका पार पडल्या, आता जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद निवडणुका म्हणजे कार्यकर्त्यांच्या निवडणुका होणार आहेत.या संधी दिली जाणार आहे. आष्टी मतदार संघातील लोक व कार्यकर्ते शरद पवार साहेबांना मानणारा आहे. आष्टी मतदार संघात सत्ता असो अथवा नसो पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. या कार्यकर्त्यांच्या जीवावर पक्ष उभा राहिला. निष्ठेने काम करून कार्यकर्त्यांनी निवडणुकीत विजय मिळवून दिला. परंतु विजय झाल्यानंतर अथवा सत्तेत गेल्यानंतर कार्यकर्त्यांचा विचार आमदारांनी केला नाही अशी खंत ही काही कार्यकर्त्यांनी या बैठकीदरम्यान व्यक्त केली.

आगामी काळातील निवडणुकांत विजय होण्यासाठी कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले. विधानसभा निवडणुकीत जे काही झाले ते सर्व मी विसरून गेलो आहे. सामान्य कुटुंबातील एक कार्यकर्ता म्हणून मी काम करतो. पक्ष मजबुत करून पक्षाला विजय प्राप्त करून देण्यासाठी माझी धडपड आहे. शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वात आपला पक्ष कायम जनमानसात अग्रेसर आहे. निष्ठावान व मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्याला न्याय देण्यासाठी ही आजची आढावा बैठक आहे. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी नेतृत्वाच्या मार्गदर्शना खाली काम करावं. असा सल्ला महेबूब शेख यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दिला.

# सुलेमान देवळा ग्रामस्थांची कामे रखडली; सतत गैरहजर असणाऱ्या ग्रामसेवकावर कारवाई करा ग्रामस्थांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे कार्यरत असलेले ग्रामसेवक शिंदे हे गेल्या कित्येक महिन्यापासून गैरहजर असून यामुळे ग्रामस्थांची वेगवेगळ्या प्रकारची कामे रखडली आहे अशा या कामचुकार अधिकाऱ्याची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी सुलेमान देवळा ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

अधिक माहिती अशी की ग्रामसेवक उद्धव शिंदे हे गेली दोन महिन्यांपासूनही जास्त दिवसांपासून सुलेमान देवळा ग्रामस्थांसाठी ते उपलब्ध नाहीत लोकांची कामे रखडली गेली आहेत. कामे घेऊन लोकांना थेट आष्टीला जावे लागत आहेत. सध्या घरकुलांची कामे चालू असून बरेच लोकांची पैसे अभावी कामे रखडली आहेत.

अशा अधिकाऱ्याची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी सुलेमान देवळा येथील युवा कार्यकर्ते शिवम घोडके सागर देसाई नंदराज घोडके तुकाराम घोडके यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

# पर्यावरण व स्वच्छतेच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येणार-आदित्य जीवने

बीड । प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या वतीने पर्यावरण व स्वच्छतेच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यात गावपातळीवर विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक आदित्य जीवने यांनी दिली आहे.

जिल्ह्यात सर्व ग्रामपंचायत मध्ये दिनांक २२ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत गावातील सार्वजनिक ठिकाणी श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे. तसेच प्लास्टिक संकलन, एकल वापराच्या प्लास्टिकचा वापरावर बंदी करणे तसेच कचऱ्याचे वर्गीकरण करून वर्गीकरण केंद्रात साठवणे याविषयी जनजागृती केली जाणार आहे. टाकाऊपासून टिकाऊ या संकल्पनेनुसार प्लास्टिक कचऱ्यापासून उपयोगी वस्तू तयार करण्याचे उपक्रमही राबवले जातील. गावात सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण व स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे. या मोहिमेचा प्रारंभ श्रमदान आयोजित करून करावा असे आवाहन मुख्य मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

यामध्ये श्रमदानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, तसेच कचरा वर्गीकरण करावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

दिनांक २८ मे रोजी मासिक पाळी व्यवस्थापन दिन साजरा करण्यात येणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा व अंगणवाड्यांमार्फत किशोरवयीन मुली व महिलांना मासिक पाळी व्यवस्थापन, स्वच्छता व सॅनिटरी नॅपकिन्सच्या वापराबाबत माहिती देण्यात येईल. यासाठी आरोग्य कर्मचारी, महिला बचत गट, महिला शिक्षिका, आशा वर्कर्स, अंगणवाडी कार्यकर्ती या विषयी जनजागृती करणार आहेत.

या सर्व उपक्रमांचे यशस्वी आयोजन गटविकास अधिकारी व संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी नियोजनपूर्वक करावे. प्रत्येक गावासाठी खतखडा भरण्याबाबत सूचना दिल्या आहेत त्याचे संनियंत्रण कर्मचारी करत आहे. या उपक्रमात सर्व ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा व हे उपक्रम यशस्वी करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

# परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी नविन नोंदणी मालिका सुरू करण्यात येणार

बीड । प्रतिनिधी

परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी नोंदणी मालिका चक२३इच् ही सद्यस्थितीत सुरु असून सदर मालिकेतील नोंदणी क्रमांकाचे वाटप संपत आलेले आहेत. त्या अनुषंगाने परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी MH23 BP 0001 Vo 9999 ही मालिका दि. ३ जून२०२५ पासून सुरु करण्यात येईल.

ज्या वाहन धारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा असेल त्यांनी आपला विहीत नमुन्यातील अर्ज, सदरील आकर्षक क्रमांकाला लागू असलेली फी च्या रकमेचा, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांच्या नावाचा धनादेश वा धनाकर्ष व आपल्या ओळखपत्राच्या व आधार कार्डच्या साक्षांकीत प्रतीसह दि. २६ मे ते ०२ जून २०२५ रोजी दुपारी २.०० पर्यंत कॅश काऊंटर खिडकी क्र. ०२ वर जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व परिवहन आयुक्तांच्या परिपत्रकानुसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची नोटीस दि. ०२ जून २०२५ रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दुपारी ०४.00 वाजता प्रसिध्द करण्यात येईल. दि. ०३ जून २०२५ रोजी एकापेक्षा जास्त अर्ज असलेल्या अर्जदारांनी दुपारी २.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये मुळ शुल्का व्यतिरिक्त अधिक रकमेचा धनादेश जमा केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ०३.०० वाजता लिलावाची विहित कार्यपध्दती अवलंबून नोंदणी क्रमांकाचे वाटप करण्यात येईल. तरी सर्व वाहन धारकांनी, नागरिकांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

# बावी येथील संत भगवान बाबा विद्यालयात पुन्हा १५ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांची शाळा भरली

आष्टी । प्रतिनिधी

संत भगवान बाबा विद्यालय बावी तालुका आष्टी जिल्हा बीड या ठिकाणी सन २०१० मध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना पुन्हा तब्बल १५ वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांची शाळा भरली.

धावपळीच्या युगात सध्या प्रत्येकजन आपल्या आपल्या व्यवसायात व कामात वेगवेगळ्या ठिकाणी दंग असलेने वेळात वेळ काढून थोडस जिवनात माघे वळून पहाण्याचा विचार काहि मित्रांच्या लक्षात आला व आता हे सर्व मित्र फक्त मोबाईल मध्येचं संपर्कात आसलेले पुन्हा एकदा एकत्रीत यायच ठरवल.हॉटसअपच्या माध्यमातून सर्वांना एसएमएस करून सर्वजण इयत्ता दहावी मध्ये २०१० मधील सर्व वर्ग मित्रांनी



संत भगवान बाबा विदयालय बावी येथे ज्या शाळेत तब्बल १५ वर्षानंतर अगमण केले. व सर्वांनी जून्या आठवणींना उजाळा दिला व ज्या गुरूजींनी आपल्या घडवले त्यांचा आदरपुर्वक सन्मान करुण गरुजनांचे सर्वांचे आभार मानले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक गर्जे सर व प्रमुख पाहुणे म्हणून,ज्येष्ठ शिक्षक लटपटेसर, गर्जेसर, फुंदेसर, दहिफळेसर, आर डी गर्जेसर, सोनवणेसर, गोल्हारसर, बडेसर उपस्थित होते.

यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी शाळेविषयी व शिक्षकांनी त्यांच्या जीवनात दिलेल्या अनमोल योगदानाविषयी मनोगत व्यक्त केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेची माजी विद्यार्थी अमोल आंधळे ,दादा लटपटे कुमार लटपटे ,विठ्ठल गर्जे ,बाळू लटपटे दिपक लटपटे ,व सर्व माजी विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मल्हारी कावळे यांनी केले.व कार्यक्रमाच्या सांगते वेळी विद्यार्थी एकत्रीत येऊन पंचपक्कवांनाचा आस्वाद घेतला.

सर्वजण मित्र पुन्हा एकत्रीत आल्याने आपले सुख दुःख ऐकमेकांना ऐकून घेत एकत्रीत आल्याने सर्वांनाचा आनंद झाला असे वर्गमित्रांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# चिंचाळा येथे ढगफुटी शेतकऱ्यांचे लाखो रुपयाचे नुकसान

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील चिंचाळा, बेलगाव, मांडवा,ब्रह्मगाव कडा व आष्टी परिसरात गुरुवारी सायंकाळी पाच वाजता जोरदार मुसळधार पाऊस होऊन शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे.

आष्टी तालुक्यात मुसळधार पाऊस यंदा मे महिन्यातचे गेल्या पाच ते सहा दिवसापासून अवकाळी पावसाने धुमाकूळ माजवला असून खरिपाच्या पेरण्याला अवधी असताना शेतीला तळ्याचे स्वरूप आले असून नदी,नाले अवकाळी पावसाने ओसंडून वाहायला लागले असून शेताच्या ताली फुटून शेतातील कांदा पिकासह , शेतातील मालाच अतोनात नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाला आहे.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी कल्पना अक्षर मुद्रणालय पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक- विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

"Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Kalpana Akshar Mudranalaya Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)